प्रकल्प सारांश

पर्यावरण प्रभाव मुल्याकंन अहवाल

प्रस्तावित 10 किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा केळी, इतर फळे तसेच मोहफुलांपासून एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल (ENA) उत्पादन प्रकल्प, 3,000 केसेस प्रतिदिन क्षमतेचा बॉटलिंग प्रकल्प, स्वतंत्र माल्ट स्पिरिट व ग्रेप स्पिरिट उत्पादन प्रकल्प तसेच फळांच्या कचऱ्यापासून 3 टन प्रतिदिन क्षमतेचा बायो-कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (Bio-CNG) उत्पादन प्रकल्प.

मे. कोरलाइफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड (सी.आर.पी.एल.)

प्रकल्प प्रवर्तक

मेसर्स कोरलाइफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड (सी.आर.पी.एल)
गट क्र. 81/82/89, मौजे खेड,
ता. लोहारा, जि. धाराशिव, महाराष्ट्र

१. प्रस्तावना

मेसर्स कोरलाइफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड (सी.आर.पी.एल) ही कंपनी कंपनी अधिनियम, 2013 (2013 चा अधिनियम क्र. 18) अंतर्गत दि. 14 जानेवारी 2025 रोजी समभाग मर्यादित स्वरूपात नोंदणीकृत करण्यात आली आहे. कंपनीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक U47190PN2025PTC237067 असून, स्थायी खाते क्रमांक AAMCC3464H आहे.

कंपनीने केळी, मोहफुले व इतर फळांपासून 10 किलो लिटर प्रति दिन क्षमतेचा एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल उत्पादन प्रकल्प तसेच प्रतिदिन 3000 केसेस क्षमतेचा बॉटलिंग प्रकल्प प्रस्तावित करण्याचे योजले आहे. याशिवाय, कंपनी 10 किलो लिटर प्रति दिन क्षमतेचा माल्ट स्पिरिट व ग्रेप स्पिरिट उत्पादन प्रकल्प तसेच फळांच्या कचऱ्यापासून 3 टन प्रतिदिन क्षमतेचा बायो- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस प्रकल्प उभारणार आहे.

सदर प्रस्तावित प्रकल्प गट क्र. 81/82/89, मौजे खेड, ता. लोहारा, जि. धाराशिव, महाराष्ट्र येथे प्रस्तावित आहे.

प्रस्तावित उत्पादने व क्षमता

अ. क्र.	घटक / युनिट	प्रस्तावित क्षमता
1	डिस्टिलरी प्रकल्प : एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल (केळी / महुआ / माल्ट / द्राक्ष स्पिरिट)	10 किलो लिटर प्रति दिन
2	बॉटलिंग प्रकल्प	प्रतिदिन 3000 केसेस मद्य बॉटलिंग क्षमता
3	उप-उत्पादन	3 टन प्रतिदिन जैव- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय,भारत सरकारच्या दि. 14 सप्टेंबर 2006 च्या पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अधिसूचनेनुसार तसेच त्यामधील वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा विचारात घेता, हा प्रकल्प श्रेणी "B" अंतर्गत प्रकल्प/क्रियाकलाप 5(g) – (मोलॅसिसविरहित आधारित) डिस्टिलरी या गटात मोडतो. त्यामुळे सदर प्रस्ताव B1 श्रेणी अंतर्गत पर्यावरणीय मंजुरी मिळविण्यासाठी राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती, महाराष्ट्र यांच्याकडे दि. 20.03.2026 मूल्यांकनासाठी विहित अर्जासह पूर्व-व्यवहार्यता अहवाल (PFR) सादर करण्यात आला होता.

त्यानुसार राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती, महाराष्ट्र यांनी दि. 24.03.2026 रोजी सदर प्रकल्पासाठी मानक संदर्भ अटी (TOR-Terms of Refernce) (संदर्भ अटी ओळख क्रमांक. TO26B2504MH5269988N) मंजूर केल्या. मंजूर टीओआर आधारित पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अभ्यास केले गेले आहे आणि मसुदा पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल तयार करण्यात आला आहे.

२. प्रकल्पाचे स्थान:

मेसर्स कोरलाइफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड यांनी गट क्र. 81/82/89, मौजे खेड, ता. लोहारा, जि. धाराशिव, महाराष्ट्र येथे एकूण 40,000 चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन खरेदी केली आहे. त्यापैकी 20,000 चौ.मी. क्षेत्राचा वापर प्रस्तावित प्रकल्पाच्या उभारणीसाठी करण्यात येणार आहे.

मौजे खेड हे गाव अक्षांश 17°58'58.16" उत्तर व रेखांश 76°22'25.12" पूर्व येथे स्थित असून, ते लोहारा तालुक्यात येते. धाराशिव जिल्हा हा अक्षांश 18°11'07.26" उत्तर व रेखांश 76°02'30.58" पूर्व येथे स्थित आहे.

सदर ठिकाणी कंपनीने केळी, मोहफुले व इतर फळांपासून 10 किलो लिटर प्रति दिन क्षमतेचा एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल उत्पादन प्रकल्प, प्रतिदिन 3000 केसेस क्षमतेचा बॉटलिंग प्रकल्प, स्वतंत्र माल्ट स्पिरिट व ग्रेप स्पिरिट उत्पादन प्रकल्प, तसेच फळांच्या कचऱ्यापासून 3 टन प्रतिदिन क्षमतेचा बायो- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे.



प्रकल्पाचे स्थान



१० किमी क्षेत्राचा स्थलाकृतिक नकाशा

प्रकल्प स्थळापासून 10 कि.मी. परिघातील प्रमुख वैशिष्ट्ये / पर्यावरणीय वैशिष्ट्ये

प्रमुख वैशिष्ट्ये / पर्यावरणीय वैशिष्ट्ये (10 कि.मी. परिघात)	प्रकल्प स्थळापासून अंतर / निरीक्षणे
राष्ट्रीय उद्यान / वन्यजीव अभयारण्य / जैवमंडल राखीव क्षेत्र / व्याघ्र प्रकल्प / हत्ती मार्गिका / पक्ष्यांचे स्थलांतर मार्ग	प्रकल्प स्थळाच्या 10 कि.मी. परिघात कोणतेही अधिसूचित राष्ट्रीय उद्यान, वन्यजीव अभयारण्य, जैवमंडल राखीव क्षेत्र, व्याघ्र प्रकल्प, हत्ती मार्गिका किंवा पक्ष्यांचे स्थलांतर मार्ग नाहीत.
ऐतिहासिक स्थळे / पर्यटन महत्त्वाची ठिकाणे / पुरातत्त्वीय स्थळे	नाही
गंभीर प्रदूषित क्षेत्र	नाही
संरक्षण स्थापना	नाही
जवळील गाव	लोहारा – 1.73 कि.मी. (पश्चिम)
जवळील विमानतळ	धाराशिव (उस्मानाबाद) विमानतळ – 46.82 कि.मी. (वायव्य)
जवळील रेल्वे स्थानक	धाराशिव (उस्मानाबाद) रेल्वे स्थानक – 47.32 कि.मी. (वायव्य)
वन क्षेत्र	नाही

जलस्रोत	मखनी धरण – 3.5 कि.मी. (ईशान्य) तेरणा नदी – 7.9 कि.मी. (ईशान्य) तलाव – 1.44 कि.मी. (नैऋत्य) तलाव – 3.06 कि.मी. (आग्नेय)
महामार्ग / प्रमुख रस्ता	लोहारा मुख्य रस्ता (MH SH-162) – 2.9 कि.मी. (नैऋत्य) लोहारा-मखनी रस्ता – भूखंडाच्या दक्षिणेकडील सीमेला लागून
आंतरराज्य सीमा	नाही
IS-1893 नुसार भूकंप क्षेत्र	क्षेत्र III

३. प्रकल्प वर्णन

प्रकल्पाचे विवरण

अ.क्र.	तपशील	माहिती
1	कंपनीचे नाव	मे. कोरलाइफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड
2	कंपनीचा पत्ता	द मेट्रोपॉलिटन बिल्डिंग, दुसरा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, शिवाजीनगर, पुणे – 411005, महाराष्ट्र
3	प्रकल्पाचे स्थान	गट क्र. 81/82/89, मौजे खेड, तालुका लोहारा, जिल्हा धाराशिव, महाराष्ट्र
4	संस्थेचे स्वरूप	खाजगी मर्यादित कंपनी
5	प्रकल्पाची क्षमता	• केळी / महुआ फुलांपासून 10 किलो लिटर प्रति दिन सेंद्रिय एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल उत्पादन • 10 किलो लिटर प्रति दिन माल्ट स्पिरिट / ग्रेप स्पिरिट उत्पादन प्रतिदिन • 3000 केसेस मद्य बॉटलिंग प्रकल्प
6	कार्यरत दिवसांची संख्या	केळी:160दिवस महुआ:60दिवस द्राक्षे:60दिवस माल्ट : 60 दिवस
7	एकूण जमीन	एकूण क्षेत्रफळ : 2.0 हेक्टर हरित पट्टा : 0.6 हेक्टर
8	उत्पादने	• केळी व महुआपासून 10 किलो लिटर प्रति दिन सेंद्रिय एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल उत्पादन • 10 किलो लिटर प्रति दिन माल्ट स्पिरिट व ग्रेप स्पिरिट • 3000 केसेस मद्य बॉटलिंग प्रकल्प
9	उप-उत्पादने	3 टन प्रतिदिन जैव- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस

10	कच्चा माल आवश्यकता	• केळी : 16,000 मेट्रिक टन/वर्ष • महुआ फुले: 1,320 मेट्रिक टन/वर्ष • माल्ट: 1,200 मेट्रिक टन/वर्ष • द्राक्षे: 5,760 मेट्रिक टन/वर्ष
11	ताज्या पाण्याचा स्रोत	मखनी धरण
12	ताज्या पाण्याची आवश्यकता	• केळीआधारित:64घनमीटरदररोज • महुआआधारित:60घनमीटरदररोज • माल्टआधारित:97घनमीटरदररोज • द्राक्षआधारित:37घनमीटरदररोज • घरगुती वापर : 3 घनमीटरदररोज
13	बॉयलर	6 टन प्रति तास
14	डी.जी. संच	125 किलोव्होल्ट-ॲंपिअर
15	वीज आवश्यकता	740 किलोवॅट-तास
16	वाफेची आवश्यकता	4.6 टन प्रति तास
17	इंधन	बायोमास (लाकडाचा भुसा / बगॅस) : 57 मेट्रिक टन/दिवस
18	सांडपाणी निर्मिती	कच्च्या मालानुसार : • केळी: 298 घनमीटरदररोज • महुआ: 208 घनमीटरदररोज • माल्ट: 158 घनमीटरदररोज • द्राक्षे: 67 घनमीटरदररोज घरगुती सांडपाणी: 2.7 घनमीटरदररोज
19	सांडपाणी प्रक्रिया	बायोमिथेनेशननंतर मल्टी इफेक्ट इव्हॅपोरेटर (MEE) व कंडेन्सेट पॉलिशिंग युनिट (CPU) द्वारे प्रक्रिया केली जाईल. CPU ची क्षमता 300 घनमीटर प्रतिदिन (300 CMD) असेल.
20	वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली	30 मीटर उंच चिमणी व धूळ संकलक
21	मनुष्यबळ	50 कर्मचारी
22	प्रकल्प खर्च	रु. 4,584.12 लाख

४. प्रकल्पच्या मूलभूत गरजा

४.१ जमीन आवश्यकता

मे. कोरलाइफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीची एकूण 2.0 हेक्टर जमीन उपलब्ध आहे. प्रस्तावित डिस्टिलरी प्रकल्पाची स्थापना सदर जागेवरच करण्यात येणार आहे.

४.२ कच्चा माल

कच्च्या मालाची आवश्यकता

अ.क्र.	कच्चा माल	आवश्यक प्रमाण	स्त्रोत	वाहतूक
1	पिकलेली केळी	16,000 मेट्रिक टन/वर्ष	स्थानिक बाजारपेठ	रस्तेमार्गे
2	महुआ फुले	1,320 मेट्रिक टन/वर्ष	रायगड, नाशिक व मध्य प्रदेश येथील बाजारपेठा	रस्तेमार्गे
3	कच्ची द्राक्षे	5760 मेट्रिक टन/वर्ष	स्थानिक बाजारपेठ	रस्तेमार्गे

4	बार्ली / माल्ट	1,200 मेट्रिक टन/वर्ष	स्थानिक बाजारपेठ	रस्तेमार्गे

४.३ पाणी आवश्यकता

प्रस्तावित 10 किलो लिटर प्रति दिन डिस्टिलरी प्रकल्पासाठी एकूण पाण्याची आवश्यकता 927 किलो लिटर प्रति दिन असेल. त्यापैकी 268 किलो लिटर प्रति दिन ताजे पाणी वापरले जाईल. 659 किलो लिटर प्रति दिन प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पाणी पुनर्वापरासाठी वापरण्यात येईल. घरगुती वापरासाठी ताज्या पाण्याची आवश्यकता 3.0 घनमीटर/दिवस असेल.

४.४ वाफ व वीज आवश्यकता

प्रकल्पासाठी आवश्यक 4.6 टन प्रति तास वाफ ही 6 टन प्रति तास क्षमतेच्या बॉयलरमधून निर्मित केली जाईल. प्रकल्पासाठी 740 किलोवॅट-तास वीजेची आवश्यकता असून ती महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड कडून प्राप्त केली जाईल. आपत्कालीन परिस्थितीसाठी प्रकल्प परिसरात 125 किलोव्होल्ट-अँपिअर क्षमतेचा 1 डी.जी. संच बसविण्यात येईल

४.५ मनुष्यबळ आवश्यकता

- बांधकाम कालावधीत सुमारे 100 व्यक्तींची आवश्यकता भासेल.
- प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी 50 व्यक्तींची आवश्यकता असेल.

४.६ प्रकल्प खर्च

प्रस्तावित डिस्टिलरी प्रकल्पाचा भांडवली खर्च रु. 45.8412 कोटी इतका असेल.

५.0 आधारभूत पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प गट क्र. 81/82/89, मौजे खेड, ता. लोहारा, जि. धाराशिव, महाराष्ट्र येथे स्थित आहे. प्रकल्पाचे भौगोलिक स्थान अक्षांश 17°58'58.16" उत्तर व रेखांश 76°22'25.12" पूर्व असे आहे.

मूलभूत पर्यावरणीय स्थिती निश्चित करण्यासाठी प्रकल्प स्थळाभोवती 10 कि.मी. त्रिज्येचे अभ्यास क्षेत्र विचारात घेण्यात आले. या अभ्यासासाठी दि. 1 मार्च 2026 ते 31 मे 2026 या कालावधीत विविध पर्यावरणीय घटकांचे क्षेत्रीय सर्वेक्षण, नमुना संकलन व विश्लेषण करण्यात आले.

५.१ परिसरातील हवेची गुणवत्ता

कणीय पदार्थ (PM10) : सर्वात कमी PM10 चे प्रमाण 45 मायक्रोग्राम/घनमीटर खेड येथे आढळली, तर सर्वात जास्त 59 मायक्रोग्राम/ घनमीटर प्रकल्प स्थळ आणि वडगाव वाडी येथे नोंदविण्यात आले.

सूक्ष्म कणीय पदार्थ (PM2.5) : सर्वात कमी PM2.5 चे प्रमाण 11 मायक्रोग्राम/घनमीटर खेड येथे आढळले, तर सर्वात जास्त 26 मायक्रोग्राम/घनमीटर प्रकल्प स्थळ येथे नोंदविण्यात आले.

सल्फर डायऑक्साइड (SO2) : सर्वात कमी SO2 चे प्रमाण 7 मायक्रोग्राम/घनमीटर खेड येथे आढळले, तर सर्वात जास्त 10 मायक्रोग्राम/ घनमीटर मोघा आणि काष्टी बुद्रुक येथे नोंदविण्यात आले.

नायट्रोजन ऑक्साइड (NOx): सर्वात कमी NOx चे प्रमाण 11 मायक्रोग्राम/ घनमीटर खेड येथे आढळले, तर सर्वात जास्त 14 मायक्रोग्राम/ घनमीटर मोघा येथे नोंदविण्यात आले.

कार्बन मोनॉक्साइड (CO) : सर्वात कमी CO चे प्रमाण 0.8 मिलीग्राम प्रति घन मीटर धनुरी येथे आढळले, तर सर्वात जास्त 1.1 मिलीग्राम प्रति घन मीटर प्रकल्प स्थळ येथे नोंदविण्यात आले.

५.२ ध्वनी पातळी

ध्वनी गुणवत्ता निरीक्षण हे पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात आले. परिसरातील ध्वनी गुणवत्तेचे विविध क्षेत्रीय वर्गवारीनुसार मूल्यांकन करण्यासाठी नऊ प्रतिनिधिक ठिकाणांची निवड करण्यात आली.

ध्वनी पातळीचे निरीक्षण दिवसा (06:00 ते 22:00 वाजेपर्यंत) आणि रात्री (22:00 ते 06:00 वाजेपर्यंत) करण्यात आले. प्राप्त झालेल्या ध्वनी पातळीच्या निकालांची तुलना ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, 2000 मधील निर्धारित मानकांशी करण्यात आली.

अभ्यासादरम्यान धनुरी येथे सर्वाधिक ध्वनी पातळी नोंदविण्यात आली. तथापि, सर्व मुल्ये हे दिलेल्या मानकाच्या खाली आहेत.

५.३ पृष्ठीय जल पर्यावरण

- **pH:** सर्व पृष्ठीय जल नमुन्यांचा pH 7.2 ते 7.9 दरम्यान आढळला.
- **एकूण विरघळलेले घन पदार्थ :** अभ्यासादरम्यान एकूण विरघळलेल्या घन पदार्थांचे प्रमाण 233 मिग्रॅ./लिटर ते 456 मिग्रॅ./लिटर या दरम्यान आढळले.
- **जैवरासायनिक ऑक्सिजन मागणी :** अभ्यासादरम्यान संकलित केलेल्या सर्व पाण्याच्या नमुन्यांमध्ये जैवरासायनिक प्राणवायू मागणी चे प्रमाण निर्धारित मानकांच्या मर्यादेत आढळून आले
- **रासायनिक ऑक्सिजन मागणी :** रासायनिक ऑक्सिजन चे मूल्य 30 मिलीग्राम/लिटर पेक्षा कमी आढळले.
- **एकूण कठोरता:** अभ्यासादरम्यान मोघा तलाव, बेंडकल तलाव आणि धनुरी तलाव येथील पाण्याच्या नमुन्यांमध्ये एकूण कठोरतेचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आढळले. तथापि, इतर

सर्व नमुना संकलन स्थळांवरील पाण्यातील एकूण कठोरतेचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा कमी आढळले

- **सल्फेट:** सल्फेटचे प्रमाण सर्व नमुन्यांमध्ये 55 मिग्रॅ./लिटरपेक्षा कमी आढळले.

५.४ भूजल पर्यावरण

- **pH:** भूजलाचा pH 7 ते 7.7 दरम्यान असून तो तटस्थ ते किंचित क्षारीय स्वरूपाचा आहे.
- **एकूण विरघळलेले घन पदार्थ :** अभ्यासादरम्यान संकलित केलेल्या पाण्याच्या नमुन्यांमध्ये एकूण विरघळलेल्या घन पदार्थांचे प्रमाण 230 मिग्रॅ./लिटर ते 280 मिग्रॅ./लिटर या मर्यादेत आढळले.
- **एकूण कठोरता:** नमुन्यांमधील कठोरतेचे प्रमाण 136 ते 178 मिलीग्राम/लिटर दरम्यान होते.
- **सल्फेट:** सल्फेटचे प्रमाण सर्व नमुन्यांमध्ये 40 मिग्रॅ./लिटरपेक्षा कमी आढळले.

५.५ मृदा पर्यावरण

- अभ्यास क्षेत्रातील मातीचा पोत भुसभुशीत स्वरूपाचा आहे. मातीची घनता 1.107 ते 1.219 ग्रॅम/सेमी^{3} तर पाणी धारण क्षमता 48.7 ते 59 % या मर्यादेत आढळली.
- अभ्यास क्षेत्रातील मातीचा pH 7.4 ते 8.1 या मर्यादेत असून ती सौम्य क्षारीय स्वरूपाची आहे.
- अभ्यास क्षेत्रातील मातीच्या अर्काची विद्युत चालकता 405 ते 685 मायक्रोसायमेन्स प्रति सेंटीमीटर या मर्यादेत आढळली असून ती 2 मिलीसिमेन्स प्रति सेंटीमीटर पेक्षा कमी आहे. मातीची धनायन विनिमय क्षमता (CEC) 23.7 ते 29.1 मिल्लीइक्विव्हॅलेंट प्रति शंभर ग्रॅम या मर्यादेत आढळली.
- मृदा विश्लेषणानुसार सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण 0.7 ते 1.6 % तर एकूण सेंद्रिय कार्बन चे प्रमाण 0.4 ते 0.9 % या मर्यादेत आढळले.
- उपलब्ध फॉस्फरसचे प्रमाण बिलासपूर येथे सर्वाधिक 29 कि.ग्रॅ./हे. तर प्रकल्प स्थळी सर्वात कमी 21 कि.ग्रॅ./हे. आढळले. उपलब्ध नायट्रोजनचे प्रमाण 224 ते 392 कि.ग्रॅ./हे. या मर्यादेत आढळले.
- अभ्यासादरम्यान जड धातूंचे प्रमाण तांबे 0.06 मिग्रॅ./लिटरपेक्षा कमी, लोह 0.09 कि.ग्रॅ./हे. पेक्षा कमी आणि जस्त 0.018 कि.ग्रॅ./हे. इतके आढळले, जे सुरक्षित मर्यादेत आहेत.

५. ६ पर्यावरणीय जीवसृष्टी

- पर्यावरण परिणाम मूल्यांकन साठी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अभ्यास क्षेत्राची मर्यादा प्रकल्प स्थळापासून 10 कि.मी. परिघापर्यंत निश्चित करण्यात

आली. अभ्यास क्षेत्रातील वनस्पती, प्राणी, पक्षी तसेच जल परिसंस्था यांचे सविस्तर मूल्यांकन करण्यात आले.

- क्षेत्रीय सर्वेक्षणादरम्यान परिसरात आढळणाऱ्या वनस्पतींची सर्वसाधारण यादी तयार करून प्राथमिक माहिती संकलित करण्यात आली. अभ्यासामध्ये एकूण 78 वनस्पती प्रजाती नोंदविण्यात आल्या असून त्यामध्ये 36 वृक्ष ,15 झुडपे, 12 औषधी वनस्पती, 11 वेलवर्गीय वनस्पती आणि 7 गवताच्या प्रजाती यांचा समावेश आहे.
- अभ्यास क्षेत्रामध्ये प्राण्यांचेही क्षेत्रीय निरीक्षण करण्यात आले. प्रकल्प स्थळाच्या 10 कि.मी. परिसरात आढळणारे सस्तन प्राणी, पक्षी, उभयचर, सरपटणारे प्राणी तसेच फुलपाखरे यांची नोंद घेण्यात आली.
- सर्वेक्षणादरम्यान सस्तन प्राण्यांच्या 11 प्रजाती आढळल्या. त्यामध्ये सामान्य कुत्रा, घरगुती मांजर, खार इत्यादी प्रमुख प्रजातींचा समावेश आहे.
- सरपटणाऱ्या प्राण्यांच्या 7 प्रजाती नोंदविण्यात आल्या असून त्यामध्ये गार्डन सरडा, भारतीय नाग, भारतीय उंदीर, साप इत्यादींचा समावेश आहे. तसेच उभयचरांच्या 3 प्रजाती सर्वेक्षणादरम्यान आढळून आल्या.
- अभ्यास क्षेत्रामध्ये फुलपाखरांच्या 15 प्रजाती नोंदविण्यात आल्या. यामध्ये युरेमा हेकॅबे, लाइम बटरफ्लाय, लेमन एमिग्रंट, प्लेन टायगर, स्ट्राइप्ड टायगर, कॉमन लेपर्ड, लेमन पॅन्सी, ब्लू पॅन्सी आणि कॉमन इव्हनिंग ब्राउन या प्रजातींचे प्राबल्य आढळून आले.
- अभ्यासादरम्यान पक्ष्यांच्या 28 प्रजाती नोंदविण्यात आल्या. त्यामध्ये हिरवा वेडा राघू, जांभळा सूर्यपक्षी, घरचा कावळा, दयाळ, भारद्वाज, पांढऱ्या छातीचा खंड्या, भारतीय मैना, तितवी, घरची चिमणी, पोपट, हुदहुद आणि कोकीळ या प्रमुख प्रजातींचे प्राबल्य आढळून आले.

५. ७ सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण

जनगणना 2011 मधील दुय्यम माहितीच्या आधारे 10 कि.मी. परिघातील अभ्यास क्षेत्राचे सामाजिक-आर्थिक विश्लेषण करण्यात आले.

- एकूण लोकसंख्या: 97,926
- एकूण कुटुंबे: 22,190
- पुरुष लोकसंख्या: 50,771
- महिला लोकसंख्या: 45,155
- सर्वाधिक लोकसंख्या असलेले गाव: जेवळी (10,886)

अभ्यास क्षेत्रातील प्रति कुटुंब सरासरी सदस्य संख्या 5 आहे.

- 6 वर्षांखालील लोकसंख्या: 12,098 (12.3%)
- लिंग गुणोत्तर: प्रति 1000 पुरुषांमागे 928 महिला

सामाजिक रचना:

- अनुसूचित जाती : 15.19%
- अनुसूचित जमाती : 1.03%
- SC व ST मिळून: 16.22%

शैक्षणिक स्थिती:

- एकूण साक्षरता दर: 67.01%
- पुरुष साक्षरता: 37.99%
- महिला साक्षरता: 29.02%

रोजगार स्थिती:

- कार्यरत लोकसंख्या: 47.19%
- गैर-कार्यरत लोकसंख्या: 52.80%
- मुख्य कामगार वर्ग: सुमारे 88%
- सीमांत कामगार वर्ग: 5.61%

शेती व कृषी मजुरी करणारे:

- शेतकरी : 13,563
- कृषी मजूर: 19,544

हे दोन्ही मिळून एकूण कामगारांपैकी 71.63% आहेत.

अभ्यास क्षेत्रातील गैर-कार्यरत लोकसंख्या 51,713 असून ती एकूण लोकसंख्येच्या 52.80% इतकी आहे.

6.0 पर्यावरणीय परिणाम व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना

6.1 वायू पर्यावरण

- 6 टन प्रति तास क्षमतेच्या बॉयलरसाठी 30 मीटर उंचीची चिमणी व धूळ संकलक बसविण्यात येईल.
- वायू प्रदूषण नियंत्रण उपकरणांची कार्यक्षमता तपासण्यासाठी चिमणी उत्सर्जनाचे नियमितपणे मान्यताप्राप्त बाह्य संस्थांकडून निरीक्षण करण्यात येईल व आवश्यक ती सुधारात्मक कार्यवाही केली जाईल.

- 6 टन प्रति तास बॉयलरसाठी ऑनलाइन उत्सर्जन निरीक्षण प्रणाली बसवून ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व प्रदूषण नियंत्रण मंडळ सर्व्हरशी जोडली जाईल.
- राख हाताळणी क्षेत्रातील उडणाऱ्या धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित पाणी फवारणी केली जाईल.
- राख हाताळणी क्षेत्राभोवती हरित पट्टा विकसित करण्यात येईल.

6.2 भू-पर्यावरण

- प्रकल्पासाठी 2.0 हेक्टर क्षेत्रफळाची जमीन निश्चित करण्यात आली आहे. प्रस्तावित प्रकल्पातील राख, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मधील सांडपाणी व गाळ इत्यादी उपउत्पादनांचा भू-पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो.
- बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त मातीचा वापर सखल भाग भरण्यासाठी करण्यात येईल. बांधकामातील अवशेष हटवून रिकाम्या जागांचे पुनर्स्थापन करण्यात येईल.
- पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात जमिनीत मुरावे यासाठी कमीत कमी काँक्रीटीकरण करण्यात येईल.
- कारखान्याबाहेरील परिसर व आसपासच्या गावांमध्ये मोफत रोपे उपलब्ध करून वृक्षारोपणास प्रोत्साहन दिले जाईल.
- बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी योग्य निरीक्षण व नियंत्रण व्यवस्था केली जाईल.
- सर्व घातक कचरा सुरक्षितपणे शेडमध्ये साठवून अधिकृत विक्रेते/पुनर्प्रक्रिया केंद्रांकडे विल्हेवाटीसाठी पाठविला जाईल.
- बांधकाम काळात निर्माण होणारा घनकचरा वर्गीकृत करून अधिकृत कचरा व्यवस्थापन केंद्राकडे पाठविण्यात येईल.
- बांधकाम काळात वापरली जाणारी रसायने, रंग इत्यादी सुरक्षितपणे साठवली जातील.

6.3 ध्वनी पर्यावरण

- सर्व फिरणाऱ्या यंत्रसामग्रीची योग्य देखभाल व वंगणकरण करण्यात येईल तसेच शक्य तेथे ध्वनीरोधक आवरणे बसविण्यात येतील.
- कंपन व ध्वनी कमी करण्यासाठी आवश्यक ठिकाणी व्हायब्रेशन आयसोलेटर्स बसविण्यात येतील.

- बेल्ट कन्व्हेयर, कॉम्प्रेसर, टर्बाइन, जनरेटर इत्यादी यंत्रसामग्री कामगार सुरक्षा आणि आरोग्य प्रशासन व पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय मार्गदर्शक तत्त्वांनुसार निर्मित असेल.
- कामगारांना इअर मफ्स, इअर प्लग्स व औद्योगिक सुरक्षा हेल्मेट्स उपलब्ध करून दिले जातील.
- आवश्यक त्या उपकरणांना ध्वनीरोधक अस्तर व सायलेंसर बसविले जातील.
- संपीडित हवा केंद्रामध्ये सक्शन साइड सायलेंसर बसविले जातील.
- बंदिस्त जागांमध्ये वायुवीजन पंखे बसविण्यात येतील.
- यंत्रसामग्रीवरील सायलेंसर व मफलरची नियमित तपासणी केली जाईल.

6.4 जल पर्यावरण

- सांडपाणी प्रक्रिया प्रस्तावित प्रकल्पासाठी ताज्या पाण्याची आवश्यकता 268 घनमीटर/दिवस असेल.
- डिस्टिलरी उद्योगातील प्रमुख सांडपाणी म्हणजे स्पेंट वॉश / पॉट एले होय. याशिवाय कूलिंग टॉवर ब्लोडाउन, बॉयलर ब्लोडाउन व डीएम प्लांट बॅकवॉशमधून सांडपाणी निर्माण होईल.
- संपूर्ण औद्योगिक सांडपाण्यावर प्रथम बायोमिथेनेशन प्रक्रिया करून त्यानंतर मल्टी इफेक्ट इव्हॅपोरेटर (MEE) व कंडेन्सेट पॉलिशिंग युनिट (CPU) द्वारे प्रक्रिया करण्यात येईल. CPU ची क्षमता 300 घनमीटर प्रतिदिन (300 CMD) असेल.
- घरगुती सांडपाण्यासाठी 3.0 किलो लिटर प्रति दिन क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बसविण्यात येईल.
- सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रणालीच्या माध्यमातून शून्य द्रव उत्सर्जन संकल्पना राबविण्यात येईल.
- प्रक्रिया केलेले सांडपाणी बागकाम व वृक्षारोपणासाठी वापरण्यात येईल.
- संपूर्ण प्रकल्प क्षेत्रासाठी पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था विकसित करण्यात येईल.
- भूजल पातळी वाढविण्यासाठी पावसाचे पाणी संधारण योजना राबविण्यात येईल.

6.5 घनकचरा व्यवस्थापन

घनकचरा निर्मिती व विल्हेवाट

अ. क्र.	तपशील	प्रमाण (मेट्रिक टन /दिवस)	प्रक्रिया / विल्हेवाट
1	डीई पिलिंग	18 मेट्रिक टन /दिवस	जैव- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस प्रकल्प प्रकल्पाकडे पाठविण्यात येईल
2	यीस्ट गाळ	1.0 मेट्रिक टन /दिवस	जैव- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस प्रकल्प प्रकल्पाकडे पाठविण्यात येईल
3	द्राक्षांचे बियाणे, साली व देठ	25.90 मेट्रिक टन /दिवस	जैव- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस प्रकल्प प्रकल्पाकडे पाठविण्यात येईल

4	बॉयलर राख	10 मेट्रिक टन /दिवस	विटा उत्पादकांना विक्री
5	स्पेंट ग्रेन	25 मेट्रिक टन /दिवस	जनावरांच्या खाद्यासाठी विक्री / जैव- कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस प्रकल्प प्रकल्पाकडे पाठविण्यात येईल

6.6 हरित पट्टा विकास

- 0.6 हेक्टर क्षेत्रावर सुमारे 1500 झाडे लावण्यात येतील (2500 झाडे/हेक्टर या दराने).
- कारखाना परिसरात व परिसराभोवती हरित पट्टा विकसित करण्यावर विशेष भर दिला जाईल.
- सर्व झाडे व हिरवळींना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.
- उन्हाळ्यात पाण्याअभावी हरित पट्ट्याचे नुकसान होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली जाईल.
- हरित पट्ट्याचा विकास व देखभाल ही प्राधान्याची बाब म्हणून विचारात घेतली जाईल.
- इमारती किंवा हरित विकासासाठी बाहेरील माती आणली जाणार नाही.

6.7 सामाजिक-आर्थिक पर्यावरण

- रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होईल, त्यामुळे स्थानिक लोकांचे रोजगारासाठी स्थलांतर कमी होईल.
- साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल.
- सेवा क्षेत्राचा विकास होईल.
- स्थानिक उत्पादनांना व सेवांना चांगला बाजारभाव मिळेल.
- जमिनीची किंमत, घरभाडे दर व मजुरी दरामध्ये वाढ होऊन स्थानिक नागरिकांना आर्थिक लाभ होईल.
- परिसरातील सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात सुधारणा होईल.
- वाहतूक, दळणवळण, आरोग्य व शैक्षणिक सेवांमध्ये सुधारणा होईल.
- व्यापार, व्यवसाय, वाणिज्य व सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे रोजगाराच्या संधी वाढतील.

त्यामुळे, प्रस्तावित प्रकल्पाचा परिसरातील सामाजिक-आर्थिक वातावरणावर एकूणच सकारात्मक व लाभदायक परिणाम होण्याची अपेक्षा आहे.

7.0 पर्यावरणीय निरीक्षण

अभ्यास क्षेत्रातील विविध पर्यावरणीय घटकांवर संकलित केलेल्या आधारभूत माहितीच्या आधारे तसेच प्रस्तावित प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांच्या अंदाज व मूल्यांकनाच्या आधारे, विविध कायदेशीर

आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी आणि पर्यावरणीय घटकांमधील बदलांचा कल ओळखण्यासाठी एक सर्वसमावेशक पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम विकसित करणे आवश्यक आहे.

हा कार्यक्रम प्रकल्पातील उत्सर्जन व सांडपाणी विसर्ग यांच्याशी संबंधित वैधानिक निकषांचे पालन सुनिश्चित करण्यास तसेच पर्यावरणीय गुणवत्तेवर सतत देखरेख ठेवण्यास मदत करेल.

पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रमांतर्गत समाविष्ट बाबी

- परिसरातील हवेची गुणवत्ता
- पाण्याचे प्रमाण व गुणवत्ता
- सांडपाण्याची गुणवत्ता
- ध्वनी पातळी
- मातीची वैशिष्ट्ये
- परिसंस्था व जैवविविधता
- घातक कचरा व्यवस्थापन
- सुरक्षा व आरोग्य तपासणी

हा पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यकालात नियमितपणे राबविण्यात येईल, ज्यायोगे पर्यावरण संरक्षण व प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित सर्व मानकांचे प्रभावी पालन सुनिश्चित करता येईल.

8.0 कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी

पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय नवी दिल्ली यांनी दिनांक 1 मे 2018 रोजी जारी केलेल्या कार्यालयीन ज्ञापनानुसार कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी लागू करण्याबाबत व त्यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुदीबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.

पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या अतिरिक्त घटक म्हणून, प्रकल्प प्रस्तावकाने प्रकल्प सुरू होण्यापूर्वी रु. 90.00 लाख (प्रकल्प खर्च रु. 45.84 कोटींच्या 2.0%) कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी उपक्रमांसाठी खर्च करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. हा निधी स्थानिक परिस्थिती व परिसरातील गरजांचा विचार करून विविध सामाजिक विकासात्मक उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी वापरण्यात येईल.

कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी उपक्रमांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद

प्रस्तावित कार्यक्रम	रक्कम (लाख रुपये)
मोगा, धनोरी, जेवळी, सालेगाव, खेड व मालेगाव येथील शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास, पिण्याच्या	90.00

पाण्याची सुविधा, मुला-मुलींसाठी स्वच्छतागृहांची उभारणी व सुधारणा	
एकूण	**90.00**

9.0 पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी खर्च

पर्यावरण संरक्षण उपाययोजनांचा खर्च

अ. क्र.	**पर्यावरणीय बाब**	**भांडवली खर्च (लाख रु.)**	**वार्षिक पुनरावर्ती खर्च (लाख रु.)**
1	वायू प्रदूषण नियंत्रण व्यवस्था (स्टॅक व डस्ट कलेक्टर)	25.00	8.50
2	बायोडायजेस्टर, मल्टी-इफेक्ट इव्हॅपोरेटर (MEE) व कंडेन्सेट पॉलिशिंग युनिट (CPU)	150.00	15.00
3	हरित पट्टा विकास	7.50	2.50
4	पावसाच्या पाण्याचे संकलन (Rain Water Harvesting)	25.00	0.50
5	पर्यावरणीय निरीक्षण (स्टॅक व CPU)	–	2.95
6	घनकचरा व्यवस्थापन	2.00	1.00
7	व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा	5.00	0.50
8	50 kW सौर ऊर्जा प्रणाली	35.00	2.00
एकूण		**249.50**	**32.95**